नियमित दिवाणी दावा क्र. ३७/२००९

प्रकाश –विरुद्ध– तेजराव

निशाणी क्र.७२ लगत निरंतर

<u>प्रतिवादी तेजराव खरात यांची उलट तपासणी वादीचे विव्दान वकील श्री. के.जी पवार यांच्या व्दारे शपथेवर घेतली गेली.</u>

प्रतिवादी म्हणाले हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ३६५ हा माझ्या मालकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक ३६५ मधील शेतजमीन मी मूळ मालक नामे जयाजी सुलाजी खरात यांच्याकडून विकत घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी प्रकाश खरात यांची शेतजमीन गट क्रमांक ३६५ च्या दक्षिण दिशेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ३६५ च्या पश्चिम बाजूने दक्षिण–उत्तर दिशेने जाणारा रस्ता हा गट क्रमांक ३७३ मधून जातो. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त रस्त्याचा उपयोग मूळ मालक जयाजी सुलाजी खरात हे जमीन विक्री करण्यापूर्वी करत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी शेतजमीन विकत घेतल्यानंतर वादींचा रस्ता अडवला होता. हे म्हणणे खरे नाही की, सध्या वादी प्रकाश खरात हे वादग्रस्त रस्त्याचा उपयोग करीत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त रस्त्यावर दगड–मुरूम टाकून वादी व इतर व्यक्तींनी तो तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शेतजमीन विकत घेण्यापूर्वीपासून वादी प्रकाश खरात हे वादग्रस्त रस्त्याचा उपयोग करीत आलेले आहेत आणि सध्या देखील करीत आहेत. मला आठवत नाही की दिनांक २८/११/२००२ रोजी तहसीलदार सिंदखेडराजा यांच्या निर्णयाप्रमाणे मी दिनांक १२/१२/२००२ रोजी वादी प्रकाश यांना वादग्रस्त रस्ता दिलेला आहे. मला आठवत नाही की तहसीलदार, सिंदखेडराजा यांनी निर्णय पारित केल्यानंतर वादग्रस्त रस्त्याची पाहणी करण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी व इतर महसूल कर्मचारी आले होते किंवा नाही. मला आठवत नाही की, मंडळ अधिकारी व

तलाठी यांनी मोजणी करून ११ फूट रस्ता वादी प्रकाश खरात यांना वापरण्यासाठी दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याच दिवशी वादी प्रकाश खरात यांनी दगड–मुरूम टाकून तो रस्ता तयार केला होता. मला आठवत नाही की, त्यावेळी मंडळ अधिकारी व तलाठी यांनी माझी देखील स्वाक्षरी घेतली होती किंवा नाही. माझे शिक्षण इयत्ता सातवीपर्यंत झालेले आहे. मी पूर्वी इंग्रजी भाषेत स्वाक्षरी करत होतो.

**उलट तपासणी पुढील तारखेपर्यंत न्यायालयाची वेळ संपल्यामुळे तहकुब**

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ–सिंदखेड राजा (सतिश ग. शिंदे)

दि.१२/११/२०२५ दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), सिंदखेड राजा